**विशेष दिवाणी दरखास्त क्रमांक ३५/२०२२**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-०००५७२-२०२२)

**<u>निशाणी क्रमांक १६ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज धनको यांनी ऋणको क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी परवानगीसाठी दाखल केलेला आहे.

२. धनको यांचे अर्जांतील कथन थोडक्यात असे :- प्रस्तुत दाव्यातील ऋणको क्र.२ हे दिनांक १३.०३.२०२१ रोजी मयत झाले आहेत. मयत ऋणको क्र.२ च्या वारसांना प्रस्तुत दाव्यामध्ये त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे तसेच सदर दरखास्तचा निर्णय गुणवत्तेवर होण्यासाठी त्यांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्याकरिता अर्जामध्ये नमुद केलेले वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती धनकोंनी केली आहे.

३. ऋणकोनी त्याच अर्जांवर म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदवली आहे. ऋणको त्यांचे म्हणण्यामध्ये असे कथन करतात की, अर्जास पुरेसे कारण नाही तसेच झालेल्या विलंबाचे अर्जातील नमुद कारण संयुक्तिक नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती ऋणको यांनी केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले, तसेच दाखल कागदपत्रे पडताळुन पाहिली असता असे दिसुन येते की, धनको यांनी सदरची दरखास्त वसुलीकरिता आणली आहे. प्रस्तुत अर्जातील ऋणको क्र.२ हे दिनांक १३.०३.२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस अभिलेखावर घेणे विलंब झालेला आहे. मयत ऋणको क्र.२ च्या वारसांना प्रस्तुत दाव्यामध्ये त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे तसेच सदर दाव्याचा न्यायनिर्णय गुणवत्तेवर होण्यासाठी त्यांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे त्याकरिता अर्जामध्ये नमुद केलेले वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात यावी. ऋणको क्र.२ यांचे वारस अभिलेखी घेण्यास झालेला उशिर माफ करण्यात आलेला आहे तसेच ऋणको क्र.२ विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश बाजूला सारण्यात आलेला आहे. त्यामुळे धनकोंवर खर्च लादुन प्रस्तुत अर्ज मंजुर करणे न्यायाचे दृष्टीने योग्य

होईल असे मला वाटते, सबब खर्च लादुन अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे, त्या बाबतचा सविस्तर आदेश खालीलप्रमाणे पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. अर्जांमध्ये नमुद केलेले मयत ऋणको क्र.२ वारस अभिलेखावर घेण्यास धनकोना परवानगी देण्यात येते तशी दुरूस्ती धनको यांनी वाद पत्रामध्ये सदर आदेश पारीत झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करण्याची आहे.

BABAR SANGITA PUNDLIK
Digitally signed by BABAR SANGITA PUNDLIK
Date: 2025.04.23 17:39:33 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- २३.०४.२०२५.

(श्रीमती. एस. पी. बाबर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.